StudentBounty.com

# मुंबई विद्यापीठ

## प्रतिज्ञा

- मुंबई विद्यापीठ हे माझे विद्यापीठ आहे आणि या विद्यापीठाचा मी एक सदस्य आहे याचा मला सार्थ अभिमान आहे.
- या विद्यापीठातील ज्ञानद आणि कार्यात्मक परंपरांविषयी मला आदर आणि प्रेम आहे.
- या विद्यापीठाच्या बहुभाषिक, बहुधर्मीय आणि वैविध्यपूर्ण स्वरुपाचा मला अभिमान आहे.
- मुंबई विद्यापीठाने रुजविलेल्या आणि जोपासलेल्या आधुनिक विचारप्रणालींचा वाहक होण्याची पात्रता माझ्या अंगी यावी, म्हणून मी सदैव प्रयत्न करेन.
- या विद्यापीठाचे कुलगुरू, प्र-कुलगुरू आणि कुलसचिव यांच्यासह सर्व गुरूजनांचा व वरिष्ठांचा मी मान ठेवीन. तसेच त्यांचा सुहृद होण्यासाठी मी प्रयत्न करेन.
- माझे सर्व सहकारी तसेच विद्यार्थी, पालक व इतरेजन यांच्याशी मी सौजन्याने व सहृदयपूर्वक वागेन.
- भारत देशातील या अतिशय प्रतिष्ठित विद्यापीठाशी मी सदैव निष्ठा राखेन.
- या विद्यापीठाचा लौकिक वाढविण्यासाठी मी कटिबद्ध आहे.
- मुंबई विद्यापीठाची शतकोत्तरी प्रतिष्ठा आणि या विद्यापीठाचा भविष्यकाळ उज्ज्वल करण्यासाठी मी सदैव प्रयत्नशील राहीन. यातच माझे सौख्य सामावलेले आहे.

www.StudentBounty.com
Homework Help & Pastpapers